दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शनिवार ४ मे २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २६१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# पंतप्रधानाचे कार्यालय हे वसुलीचे कार्यालय- बाळासाहेब आंबेडकर

## गेल्या १० वर्षात ८४ हजार शेतकरी,शेतमजूर यांच्या आत्महत्या

## राजकीय पक्ष हे कुटुंबशाहीला नि घराणेशाहीला पोसत आहेत.

## १० वर्षात १७ लाख कुटुंब भारत देश सोडून गेले; भाजपाच्या हातात सत्ता दिली तर ४० लाख कुटुंब येणाऱ्या काळात देश सोडुन जातील

# मोदी आणि महाविकास आघाडीवर घणाघात

## गरीब मराठ्यांना आरक्षण दिले पाहिजे ही काळाची गरज



गेल्या १० वर्षात देशातील ८४ हजार शेतकरी व शेतमजुरांनी आत्महत्या केल्या याची बातमी कुठेही आली नाही. यापैकी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना मोदीने किती मदत दिली याची माहिती द्यावी असे अँड. बाळासाहेब आंबेडकर यांनी घणाघात केला. ते वंचित बहुजन आघाडी बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाईत आयोजित परिवर्तन सभेत बोलत होते. यावेळी नागरिकांची मोठी उपस्थिती होती. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, उमेदवार अशोक हिंगे यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना म्हणाले की, पंतप्रधान यांचं कार्यालय हे मानवतेच कार्यलाय असताना हे वसुलीचे कार्यलाय झालं, राजकारणात नीतिमत्ताची फार मोठी किंमत आहे. मात्र सध्याची परिस्थिती पाहता राजकारणात कुठेही नीतिमत्ता दिसत नाही असं म्हणत महायुतीवर निशाणा साधला.मोदी असं म्हणतात माझ्या कालावधीत काहीच करप्शन झालं नाही काँग्रेसवल्यानी लिस्ट काढली त्या लिस्ट मध्ये किती ठिकाणी कारप्शन झालं याची लिस्ट काँग्रेसवाल्यानी दिली ती अँड.बाळासाहेब आंबेडकर यांनी जनतेसमोर वाचून दाखवली. महागाई बरोबर बेरोजगारी वाढली, मोदींमुळे सगळं देशोधडीला लागले, हे चोरांचे, व्यापाराचे, लुटारांचे सरकार आहे. इथले शासन राज्य करण्यासाठी नाही तर तोडमोड करण्यासाठी आहे .मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण साठी राजकीय भूमिका घेणं अवघड झालं. इथल्या गरीब मराठ्यांना आरक्षण दिलं पाहिजे ही काळाची गरज आहे. शरद पवारांना देखील मी भूमिका घेण्यासाठी सांगितले होते असं ऍड.आंबेडकर म्हणाले अंबाजोगाई येथील सभेला उपस्थित मान्यवर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड प्रकाश आंबेडकर,बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे पाटील, जिल्हाध्यक्ष अध्यक्ष शैलेश कांबळे, मिलिंद घाडगे,पंजाबराव डक, विष्णु जाधव, डॉ.धर्मराज चव्हाण,महेश निनाळे,तय्यब खान,बिबीशन चाटे, खाजामिया पठान, बाबुराव मस्के,विष्णु देवकाते वैभव स्वामी,डॉ. नितिन सोनवणे, प्रा. छाया हिरवे,अँड अनिता चक्रे, पुष्पाताई तुरूकमारे,यूनुस शेख,पुरुषोत्तम वीर,सुरेश पोतदार,धम्मनंद साळवे,सचिन उजगरे,अंकुश जाधव, रानबा उजगरे, बालाजी जगतकर,अजय सरवदे, बालासाहेब जगतकर,गौतम आगळे, प्रसन्नजित रोडे,चंद्रकांत खरात, रोहन मगर, पुर्वचे जिल्हा तालुका व शह ,समता सैनिक, भारतीय बौद्ध महासभा,सम्यक विद्यार्थी आंदोलनचे पदाधिकारी उपस्थित होते.

उमेदवार अशोक हिंगे पाटील जातीपातीचे नाहीतर विकासाचे राजकारण करणार, महाविकास आघाडी व महायुती हे दोघे एकच आहेत, त्यांना धडा शिकवण्यासाठी मला अँड. प्रकाश आंबेडकर यांनी बीड लोकसभेची उमेदवारी दिली आहे. मराठा आरक्षण तसेच मुस्लिम, धनगर,आरक्षण प्रश्नावर आपण अगोदरही भूमिका घेतली आहे.आत्ता ही घेली आहे. आणि यापुढेही भूमिका घेऊन मिळवून देण्याचा प्रयत्न करणार आहे. यामुळे मला लोकसभेत पाठवा, प्रस्थापित राजकीय धडा शिकवा आसे सांगीतले.

संपादकीय

# लेखन अन् मी

मराठी साहित्याचा वारसा जपणारा लेखक आनंदे भरीन तिन्ही लोक...
रमेश पाटील कोल्हापूर

आनंदे भरीन तिन्ही लोक...... बहिणाबाई चौधरी संसाराचं तत्वज्ञान सोप्या भाषेत उलगडून सांगताना म्हणतात, कुटुंब आणि घर हा संसाराचा गाभा असतो.पती आणि पत्नी ही संसाराच्या गाड्याची दोन चाकं असतात. ती दोन्ही भक्कम आणि समान असावी लागतात, तेव्हाच हा गाडा सुरळीतपणे चालू शकतो. याशिवाय त्या परस्परांमध्ये विश्वास असलाच पाहिजे.अनेकदा दोघांच्या आवडीनिवडी आणि छंद वेगवेगळे असतात. ही भिन्नता,परस्परांमधील संवाद कमी होणे, गैरसमज, ईर्षा या बाबी त्यांच्यात दरी निर्माण करतात आणि सुखी संसाराला ग्रहण लागते.त्यामुळे पतीपत्नींनी एकमेकांवर कुरघोडी करत,स्पर्धा करत जगण्यापेक्षा परस्परांना समजून घेऊन एकमेकांतील संवाद साधत चालू ठेवत आणि मतभेदांच्या मुद्द्यांवरही बोलून तोडगा काढला तर संसार स्वर्ग होऊ शकतो.एका प्रेमविवाह झालेल्या जोडप्यापैकी नव-याला लग्नानंतर भयंकर आजाराला सामोरे जावे लागले .अशावेळी पत्नीने खंबीरपणे संसाराचा गाडा ओढला.संसारात होणा-या मुलांच्या संख्येचाही कुटुंबाच्या सौख्यावर परिणाम होतो.समर्थ रामदासांनी या स्थितीचे योग्य वर्णन केले आहे.एके ठिकाणी ते म्हणतात, .संसारात अनेकदा एखाद्या सदस्याच्या चुकीकडे कानाडोळा करणे हे त्या कुटुंबाच्या स्वास्थ्यासाठी योग्य असते.श्यामची आई हे पूज्य साने गुरुजींनी कथेच्या रूपात लिहिलेली सुंदर रचना.यातील ‘ अळणी भाजी ‘ ही एक बोधप्रद गोष्ट. एके दिवशी श्याम वडिलांसोबत जेवायला बसतो. आईनं केलेली भाजी आळणी होती.कामाच्या घाईत भाजीत मीठ घालायला ती विसरली होती. पण वडील काहीच बोलत नाही म्हणून कुणीच काही बोललं नाही.उलट वडील भाजीची प्रशंसाच करत.पसारा आटोपून आई जेवायला बसली तेव्हा भाजी आळणी असल्याचं तिला समजलं आणि तिलाच वाईट वाटलं .यावर गुरुजी म्हणतात, आईला वाईट वाटू नये म्हणून वडील काही बोलले नाही.इतक्या खटपटीने तिने चुलीजवळ बसून स्वयंपाक केला, त्यात दोष पाहू नये.स्वयंपाक करणा-याचे मन दुखवू नये,ही वडीलांनी दृष्टी. संसारात सुख हे भौतिक बाबींवर अवलंबून नसते. ते मानण्यावर असते. महाराष्ट्रातील ज्येष्ठ लोकशिक्षक असा ज्यांचा गौरव केला जातो त्या गाडगेबाबांच्या संसाराची कल्पना व्यापक होती.आजूबाजूची अस्वच्छ,विषम,अनिष्ट अमंगलता धुवून काढण्यासाठी त्यांनी घरादाराचा त्याग करून आयुष्यभर निस्पृहपणे प्रबोधनाचे कार्य केले. गाडगेबाबांचा एकुलता एक मुलगा (गोविंदा) पिसाळलेले कुत्रे चावून वारला.तेव्हा बाबा कोकणात एके ठिकाणी कीर्तन करत होते.मुलगा वारल्याची तार कुणीतरी वाचून दाखवली.सर्व श्रोत्यांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या.कीर्तन न थांबवता बाबा म्हणाले, ” मरती ऐसे अनंत, एकाची का करू खंत “. हे विश्वची माझे घर या भावनेतून जगलेले संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ” अवघाची संसार सुखाचा करीन,आनंदे भरीन तिन्ही लोक”.

# सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे महादेववाडी व कव्हे ता. माढा जि. सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन - डि. सोलापूर सब डि व ता. माढा पैकी मौजे महादेववाडी ता. माढा जि. सोलापूर येथील शेतजमीनीचे वर्णन पुढीलप्रमाणे गट नं.९६/१/अ यांसी क्षेत्र ०२हे २९आर, पो.ख.००हे ०३आर, आकार ०४रु.४० पैसे, एकुण क्षेत्र ०२हे ३२आर यांसी चर्तुः सिमा पुर्वेस ज्ञानेश्वर अनिरुध्द ढेरे यांची जमीन, पश्चिमेस - नागनाथ कृष्णा ढेरे यांची जमीन, दक्षिणेस समाधान रिगुडे यांची जमीन, उत्तरेस - मारुती अनंतर चोपडे यांची जमीन. येणेप्रमाणे चतुःसिमेतील जमीन आतील तदंगभुत वस्तुसह. वर नमुद मिळकत ही आमचे अशिलाचे एकत्र हिंदु कुटूंबाची मालकी वहिवाटीची मिळकत आहे. सदरच्या मिळकतीत आमचे अशिल अनिरुध्द धनराज ढेरे व त्यांच्या कुटूंबाचा अविभक्त हिस्सा आहे. आमचे अशिल हे युवराज ढेरे यांचे नात्याने वडील आहेत. आमचे अशिलाचा मुलगा युवराज अनिरुध्द ढेरे हा व्यसनाच्या आहरी जावुन वर नमुद मिळकतीत ७/१२ सदरी असलेल्या नावाचा गैरफायदा घेवुन नमुद मिळकत ही तारण स्वरुपात देवुन ऊसनवार, खरेदी विक्रीचा व्यवहार करु लागलेला आहे. तशाप्रकारे गैरव्यवहार युवराज अनिरुध्द ढेरे यांचेसोबत करु नये. तसे झाल्यास आमचे अशिलाचे हक्क हिश्यावर बंधनकारक राहणार नाही.

सबब वर नमुद मिळकतीविषयी कोणीही कसल्याही प्रकारचा हस्तांतर स्वरुपाचा व्यवहार करु नये. उदा. विक्री, साठेखत, खरेदीखत कब्जेसाठेखत, इ. स्वरुपाचे व्यवहार युवराज अनिरुध्द ढेरे यांचे बरोबर कोणीही करु नये. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन जाहीर नोटीस दिली असे. ता.०३/०५/२०२४

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**स्वाक्षारीत:**
**(श्री. अनिरुध्द धनराज ढेरे)**

# कोटनाका, काळाधोंडा येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची निर्दोष सुटका.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**



उरण रेल्वे स्टेशन जमीन संपादनाच्या बदल्यात मोबदला आणि रोजगार मिळावा म्हणून उरण कोटनाका, काळाधोंडा येथील स्थानिक रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने लोकशाही मार्गाने व कायदेशीर व शांततेच्या मार्गाने साखळी उपोषण आणि आंदोलन करण्यात आले होते.मात्र तरीही सदर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल झाले होते. सदर प्रकरण उरण न्यायालयात गेले. उरण न्यायालयाने सदर आंदोलकांची निर्दोष सुटका केली आहे.

उरण रेल्वे स्टेशनने नव्याने बांधकाम सण २०१३ मध्ये सुरू केले होते. सदर जागेचा मोबदला मिळाला नाही म्हणून स्थानिक शेतकऱ्यांनी आंदोलन व साखळी उपोषण पुकारले होते. त्या वेळी रेल्वे प्रशासन तसेच सिडको प्रशासनाने शेतकऱ्यांना कोणतीही नोटीस न देता काम सुरू केले होते. या विरोधात सर्व रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकरी व कोट गाव ग्रामस्थांनी २०१९ मध्ये साखळी उपोषण आणि आंदोलन पुकारले होते त्या वेळी उरण पोलिसांनी काही राजकीय दबावाला बळी पडून काही आंदोलकांवर १) निलेश गणपत भोईर,२)सुनील गजानन भोईर ३)कृष्णा.ल.जोशी या शेतकरी प्रकल्पग्रस्तांवर उरण पोलीस ठाण्यात सण २०२१ मध्ये भारतीय दंड विधान ३४१,५०४,५०६,प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर खटल्याची अंतिम सुनावणी झाली असून उरण कोर्टाचे न्यायाधीश श्री निलेश एम वाळी यांनी आंदोलन कर्त्यांची दिनांक २/५/२०२४ रोजी निर्दोष सुटका केली. आंदोलनांच्या वतीने उरणचे सुप्रसिद्ध वकील ॲड पराग म्हात्रे यांनी काम काज पाहिले.आणि त्यामुळे शेतकरी आंदोलन कर्त्यांची निर्दोष सुटका करण्यात आली. या निर्णयाचे स्थानिक कोट गाव ग्रामस्थांनी आणि उरण शहरातील नागरिकांनी स्वागत केले असून आंदोलकांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# देशाच्या घटनाकाराला मानवंदना देऊन जलौषात भीम जयंती साजरी

**वादळवार्ता/चौसाळा**

बीड तालुक्यातील चौसाळा हे गाव म्हणजे सर्व धर्म समभाव असणारे गाव म्हणुन ओळखले जाते ,चौसाळा गावात महामनावांच्या जयंत्या धार्मिक उत्सव मोठया हर्षौउल्हासात साजरा केले जातात. भारताचा कोहिनुर हिरा म्हणुन ज्या विश्ववंदनीय बाबासाहेबांना मानले जाते त्या विश्वरत्न बोधीसत्व डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठया उत्साहात चौसाळा शहरात साजरी करण्यात आली.चौसाळा शहरात अठरा पगड जात धर्माचे बांधव सामाजिक सलोखा राखत आनंदाने नांदतांना दिसतात. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,अन्नाभाऊ साठे आणी सर्व महापुरूषांच्या जयंत्या आणी धार्मिक उत्सव एकोप्याने साजरे करणारे गाव म्हणजे चौसाळा अशी ओळख चौसाळा या गावची झालेली आहे. महापुरुषांच्या जयंत्या मधुन समाजप्रबोधना बरोबरच विविध कला गुणांना वाव देणार्या स्पर्धा सुध्दा आयोजित केल्या जातात. चौसाळा शहरात विविध जात ,धर्म, पंथाचे बांधव जरी रहात असले तरीही सार्वजनिक कार्यात आणी कार्यक्रमात सर्वजन हिरीरीने भाग घेतात हे विशेष. यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीची मिरवणूक राजर्षी शाहु नगर या ठिकाणाहुन भव्य दिव्य स्वरुपात काढण्यात आली.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस कृषी उत्तपन्न बाजार समितीचे संचालक शरद झोडगे ,भाजपा अनुसुचित जाती मोर्चा बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर,अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष सलिम जहागिरदार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले यावेळी जयंती उत्सव समितीचे आयोजक तथा चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्रजी पवार गटाचे शिरूर लोकसभा मतदार संघाचे प्रमुख पांचग्रे साहेब, एकता ग्रुपचे अध्यक्ष स्वप्नील सोनवणे ,यांच्या सह महीला भगिणी या मिरवणुकीत मोठया संख्येने उपस्थीत होत्या. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या या मिरवणुकीत भिम अनुयायी आणी चौसाळा परिसरातील नागरिकांनी जयंतीत सामील होऊन आपल्या डोक्यावरती निळे आणी पांढरे शुभ्र फेटे बांधलेले होते एकदंरीत चौसाळा शहर निळं निळं झालेलं बघायला मिळाले.भारतीय घटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकरांनी भारत देशास बहाल केलेल्या घटनेचे पालन करत बंधुभाव, एकता,सामाजिक सलोखा या सर्व हितकारक विचारांचे पालन करत चौसाळा शहरातील नागरिक आपल्या बाबांची जयंती उल्हासात साजरी करतांना दिसले.चौसाळा शहरातील छत्रपती शाहु महाराज यांच्या चौकास पुष्प हार अर्पण करून ही मिरवणुक वाजत गाजत आणी महापुरुषांच्या नावाच्या उद्घोषणा करत संपुर्ण चौसाळा शहरात साजरी झाली. तरुण, महीला ,व्रुध्द आणी लहान बालकांचा जल्लोष या मिरवणुकीत बघायला मिळाला. जात ,धर्म, पंथ यांना बाजुला सारुन सर्व जाती धर्माचे नागरिक या जयंती सोहळयात न्हाऊन निघाल्याचे चित्र चौसाळा येथे बघायला मिळाले.चौसाळा शहरात अनेक महापुरूषांच्या नावाने चौक आहेत या सगळया महापुरुषांच्या नावाच्या चौकांना पुष्पहार अर्पण करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती मोठया उत्साहात पार पडली. या जयंती सोहळयात साहील सोनवणे,गणेश सोनवणे,मच्छींद्र गायकवाड,वैभव सोनवणे,विजय बोबडे,समाधान पौळ,कृष्णा चव्हाण,प्रकाश ढोकणे, राज सोनवणे,शंकर सोनवणे,नितीन काळे,निवांत वाघमारे,साजिद पठाण,तोफेक पठाण,अनिल पवार,जितीन काळे,पत्रकार संघाचे मार्गदर्शक बळीराम राऊत,पत्रकार अजमेर मनियार,पत्रकार ख्वाजाभाई जहागिरदार आमोल जावळे, प्रदीप ईंगोले,विकी चव्हाण, रवि सोनवणे,मुस्तगिर जहागिरदार, आसेफ जहागिरदार,मुजमिल जहागिरदार,आसेफ कुरेशी सह चौसाळा शहरातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी ,पत्रकार मोठया संख्येने उपस्थीत होते.

# रक्तदान शिबिरसह सामाजिक उपक्रमांनी माजी मंत्री बदामराव पंडितांचा वाढदिवस साजरा

**वादळवार्ता/गेवराई**

शिवसेना नेते बदामराव पंडित यांना दैवत मानणाऱ्या गेवराई तालुक्यातील कार्यकर्ते व शिवसैनिकांकडून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात वाढदिवस साजरा करण्यात आला. तालुक्यातील विविध गावांमध्ये जनावरांना चारा रुग्णांना फळे वाटप करून शहरात रक्तदान शिबिर घेण्यात आले.

शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या निवासस्थानी सौ गिरीकाभाभी पंडित, सौ अनुरूपाताई युधाजित पंडित यांनी औक्षण केले. याप्रसंगी जि.प. चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवानेते रोहित पंडित, राजवीर पंडित, नयनतारा पंडित यांची उपस्थिती होती. बदामराव पंडित यांना शुभेच्छा देण्यासाठी सकाळपासूनच शहरासह ग्रामीण भागातील विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांसह शिवसैनिक व नागरिकांनी त्यांच्या निवासस्थानी गर्दी केली होती. राष्ट्रपुरुषांच्या जीवन कार्याची माहिती देणारी पुस्तके त्यासोबतच वृक्ष, शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन आलेल्या चाहत्यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी आलेल्या प्रत्येकाशी अस्थेवाईकपणे चर्चा केली. तालुक्यातल्या प्रत्येक गावात असलेल्या अडीअडचणी याचीही माहिती उपस्थितांकडून घेतली.



दरम्यान दुपारी शिवसेना भवन गेवराईच्या शेजारी असलेल्या कॉम्प्लेक्समध्ये वाढदिवसानिमित्त युवानेते उज्वल सुतार आणि पप्पू चव्हाण यांच्या सहकाऱ्यांनी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरालाही माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी भेट दिली. या रक्तदान शिबिरात शेख अजर, आमोल शिंदे, गप्पू राठोड, अविनाश चव्हाण, अमर पवार, बाळासाहेब देवकर, विशाल हातवले, भास्कर हातगुले, आशोक सुळ, सतिश जाधव, अमोल जवरे, अमोल सुतार, मुकुंद बाबर, दामोधर मोरे, बलराम काशिद, सुर्यांकांत टकले, एकनाथ भोसकर, वैभव पवार, गोरख लिंगसे, शिवाजी कोटे, अनिकेत डिंगरे, आकाश झेंडे, आशोक जाधव, सुरज साळुके, उज्वल सुतार, सुरेश वाघमारे आदींसह युवकांनी रक्तदान केले. याप्रसंगी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्यासह जि प चे माजी सभापती युधाजित पंडित, युवानेते रोहित पंडित सरपंच किरण आहेर, सुनील कांडेकर, पापा चव्हाण, बंडू पवार, गणेश चव्हाण , शिवसेना उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, शहर प्रमुख शेख शहदाद, साईनाथ सुतार, सतीश पौळ, गोवर्धन येवले, बाबू पौळ, सुभाष राठोड, गणेश येवले, सतीश सपकाळ, धर्मराज लेंडगुळे, पप्पू कोठेकर आदींची उपस्थिती होती.

# माजी खासदार आणि मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष संजय निरुपम शिवसेना पक्षात जाहीर

**वादळवार्ता/पंकज भंडारी**
माजी खासदार आणि मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष संजय निरुपम यांनी तब्बल वीस वर्षांनी घरवापसी करत आज शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. ठाण्यातील आनंदआश्रम येथे पार पडलेल्या या पक्षप्रवेशावेळी त्यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनीही शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे पक्षात स्वागत करून त्यांना भावी सामाजिक आणि राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यात निरुपम यांच्यासोबत काँग्रेस उपाध्यक्ष जयप्रकाश सिंह, मुंबई काँग्रेसचे सरचिटणीस अंजय श्रीवास्तव, मुंबई काँग्रेस सहकार सेलचे अध्यक्ष दिलीप राजपुरोहित, मुंबई काँग्रेस सचिव फिरोज शहा, रश्मी मेस्त्री, ॲड. प्रद्युम्न वाघमारे, आनंद त्रिपाठी, मुंबई उत्तर पश्चिम जिल्हा काँग्रेसचे ब्लॉक अध्यक्ष सूरज गुप्ता, बाळा तिवारी, अरुण सुवर्णा, पाचुराम जयस्वाल, सर्वेश जयस्वाल, अमित कोचरे यांच्यासह असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेत पक्षप्रवेश केला. यावेळी वीस वर्षांनी पुन्हा एकदा शिवसेनेमध्ये सक्रिय होत असल्याबद्दल संजय निरुपम यांचे स्वागत केले. लोकसभा निवडणुकीत स्वतःहून महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी संपूर्ण ताकद पणाला लावण्याची तयारी त्यांनी दाखवली आहे. संजय निरुपम यांच्यासह आलेल्या कोळी बांधवांनी पारंपरिक कोळी टोपी आणि कोळी बांधवांच्या उपजीविकेचे साधन असलेल्या माशांची प्रतिकृती देऊन माझा सन्मान केला. यावेळी आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, महायुतीचे ठाणे लोकसभा मतदारसंघातील उमेदवार नरेश म्हस्के, ठाणे जिल्हा महिला संघटक सौ.मीनाक्षी शिंदे, ठाणे विधानसभा प्रमुख हेमंत पवार आणि शिवसेनेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# साहित्यिक दीपा वणकुद्रे यांना साहित्य दर्पण पुरस्कार प्राप्त



०१ मे, महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून, महाराष्ट्र साहित्य परिषद व कवयित्री बहिणाबाई साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुरस्कार सोहळ्यात - ज्येष्ठ साहित्यिक मा. जनार्दन ओक, मा. शामसुंदर पांडे (अखिल भारतीय साहित्य परिषद, कल्याण अध्यक्ष), मा. विजय सरीने (शिक्षण अधिकारी, कल्याण), मा. भानुदास डोहाळे (सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी, मुंबई), मा. विष्णू पाटील (मसाप- उल्हासनगर अध्यक्ष), या मान्यवरांच्या हस्ते साहित्यिक दीपा वणकुद्रे यांना “साहित्य दर्पण” पुरस्कार प्राप्त.

## ठाणे लोकसभा मतदारसंघाचे महायुतीतील शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी आज आपला उमेदवारी अर्ज केला दाखल




**वादळवार्ता/ठाणे**
ठाणे लोकसभा मतदारसंघाचे महायुतीतील शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी यांच्यासह उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच त्यापूर्वी ठाणे शहरात महायुतीच्या वतीने विराट रॅली काढून महायुतीचे शक्ती प्रदर्शन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित ठाणेकर नागरिकांना संबोधित करताना नरेश म्हस्के यांना दिले जाणारे मत म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांना मिळणारे मत आहे. त्यामुळे महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन केले. यंदाची निवडणूक ही विकासाची निवडणूक असून देशाला खरोखरच पुढे घेऊन जायचे असेल तर पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे हात बळकट करावे लागतील. पंतप्रधान मोदीजी यांनी देशाची अर्थव्यवस्था ११ व्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर आणली आहे. देशाच्या जीडीपी मध्ये सर्वाधिक भर घालणारे आपले राज्य आहे. पाच ट्रीलियनची अर्थव्यवस्था करायची असेल तर त्यासाठी एमएमआर रिजनचा त्यात मोठा वाटा असणार आहे. त्यामुळे ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी या जागेवर महायुतीचेच उमेदवार जिंकायला हवेत. त्यासाठी एकदिलाने कामाला लागा आणि म्हस्के यांना बहुमताने विजयी करा असे आवाहन ठाणे लोकसभा मतदारसंघातील मतदारांना केले. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते व आमदार गणेश नाईक, आमदार सौ.मंदा म्हात्रे, माजी खासदार संजीव नाईक, आमदार प्रताप सरनाईक, आमदार संजय केळकर, माजी आमदार रवींद्र फाटक, मनसे नेते अभिजित पानसे उपस्थित होते.

# अजिंठा घाटात बस पलटी होवून नऊ जण जखमी

वादळवार्ता/सोयगाव
संभाजीनगर /जळगाव महामार्गावरील अजिंठा घाटात बस पलटी होवून नऊ जण जखमी झाल्याची घटना शुक्रवारी (ता. तीन) दुपारी एकच्या सुमारास घडली .

सदर बस पुणे येथून रावेर येथे ६६ प्रवासी घेऊन जाणारी बस (क्र. एमएच ४०वाय ५१९७ ही बस अजिंठा घाटात दुपारी एक वाजेच्या सुमारास रस्त्याच्या बाजूने पलटी झाली यात नऊ प्रवाशी गंभीर जखमी झाले घटनेची माहिती मिळताच सहायक पोलिस



निरिक्षक प्रफुल साबळे यांनी फौजदार शरद वाघुले, रामराव आढे, भागवत शेळके, ज्ञानेश्वर बेले, ईश्वर पाटील, निलेश लोखंडे पोलीस मित्र आदी सहकार्यासह घटनास्थळी धाव घेऊन स्थानिकांच्या मदतीने बचाव कार्य सुरू केले आहे. नऊ जखमीना अजिंठा ग्रामीण रुग्णालयात रुग्णवाहिकेद्वारे उपचारासाठी हलविले व बाकी सुखरूप असलेल्या प्रवाशांना दुसऱ्या बस मध्ये बसवून दिले ही घटना दरम्यान गंभीर जखमी झालेल्या तिघांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजी नगर येथील शासकीय रुग्णालय घाटी येथे पाठवण्यात आले .

# आम आदमी पार्टी प्रचाराच्या मैदानात

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे / पंकज भंडारी**

पुणे आप जेल का जवाब वोट से केजरीवालांना खोट्या गुन्ह्यामध्ये कुठलाही पुरावा सादर न करता अनेक दिवसापासून तिहार जेलमध्ये ठेवण्यात आले आहे. आम आदमी पार्टीने इंडिया फ्रंट महाराष्ट्र मध्ये महाविकास आघाडीला पाठिंबा देण्यात आला आहे. त्याचेच अवचित साधून बारामती लोकसभेचे उमेदवार सुप्रिया सुळे यांचा प्रचार करण्यासाठी आम आदमी पार्टी घरोघरी जाऊन पत्रक वाटणे कोपरा सभा घेणे प्रशांत कांबळे शहराध्यक्ष अनुसूचित जाती यांच्या मार्गदर्शनाखाली हनुमान नगर, सच्चाई माता परिसर आंबेगाव खुर्द या भागामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये कार्यकर्ते नागरिक मिळून संपूर्ण परिसरामध्ये जनजागृती करण्यात आली त्याचबरोबर मतदान करण्याचे सुद्धा आव्हान करण्यात आले. कोपरा सभेमध्ये बोलत असताना प्रशांत कांबळे यांनी ही लढाई अस्तित्वाची आहे. हुकूमशाही घालून लोकशाही बळकट करायचे आहे. त्यासाठी प्रत्येकाने मतदान केले पाहिजे ज्या पद्धतीमध्ये बीजेपी सरकार मोदी, शहा यांची हुकूमशाही या भारतामध्ये चालू आहे. शाळा, कॉलेज सरकारी प्रायव्हेट करण्याचं काम या सरकारने दहा वर्षात केले आहे. ई



डी , सीबीआयचा गैर वापर शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळत नाही. दहा वर्षात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, मराठा समाजाला त्यांच्या हक्काचा आरक्षण मिळाला नाही. अनेक मराठी बांधवांनी आरक्षणासाठी आत्महत्या केली इलेक्ट्रॉन बॉण्डच्या माध्यमातून बीजेपी महाघोटाळा करताना दिसत आहे. खोट्या जाहिरातीच्या माध्यमातून संपूर्ण देशाला भ्रमित करण्याचे काम हे सरकार करत आहे. भारताचा दुश्मन पाकिस्तान यांच्याकडून सुद्धा इलेक्ट्रॉन बॉण्डच्या माध्यमातून पैसे घेतले आहेत. असा घनगती आरोप सभेच्या माध्यमातून केला. त्यावेळेस सागर पाटील प्रदेश सहसचिव पुणे शहराध्यक्ष सुदर्शन जगदाळे, धनंजय बेनकर महासचिव अक्षय शिंदे, सतीश यादव उपाध्यक्ष अनिल कोंढाळकर क्रीडा उपाध्यक्ष नौशाद अन्सारी युवा उपाध्यक्ष निखिल खंदारे,ॲड.गजानन थरकुडे, भगत सिंग, गजानन भोसले, किरण कद्रे, लक्ष्मण केतन, संतोष शेंबडे,प्रकाश कुंभार, नरेंद्र पारखे, प्रीतम कोंढाळकर,बालाजी कंठेकर, शुभम बिराजदार, ॲड. वैभव जोशी,संतोष थोरात, सुवर्ण धंडे, दिपाली शेंबडे, सारिका केकान पूजा फलके स्वाती कांबळे गयाबाई जाधव सारिका सिंग दिपाली धंडे,सुनील चव्हाण महादेव चांदणे प्रवीण मिसाळ संभाजी नेटके विजय केगाळ आप्पा रणदिवे दत्ता काकरे बालाजी सामोसे यदी नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

# दहीफळ येथील वडमाऊली देवीच्या यात्रेचे रविवार पासून आयोजन

## ग्रामिण जनतेच्या मनोरंजनासाठी यात्रा कमेटीने ठेवला लोकनाट्यांचा कार्यक्रम

**वादळवार्ता/केज**


दहीफळ वडमाऊली येथे तिर्थक्षेत्र असलेल्या वडजुआई ( वडमाऊली ) देवीचा यात्रा महोत्सव दि.५ मे रविवार पासुन सुरू होत आहे. या यात्रेनिमीत्त दि.५ ते ९ मे दरम्यान होत असलेल्या यात्रेनिमित्त लोकनाट्य( तमाशा ),आराधी गिते या सांस्कृतीक कार्यक्रमाला पंचक्रोशितील भावीक भक्तानी मोठ्या संख्येने उपस्थित राहून यात्रेची शोभा वाढवावी असे आव्हान यात्रा कमेटीचे अध्यक्ष येडूनाना ठोंबरे,सचिव भिकचंद ठोंबरे (सावकार), सदस्य हारीमास्तर ठोंबरे सह सर्व सदस्यांनी केले आहे.

केज तालुक्यातील दहीफळ वडमाऊली येथे तिर्थक्षेत्र वडजुआई ( वडमाऊली ) देवीचे मंदीर आहे दरवर्षी चैत्र महीन्यातील अष्टमी पासुन या यात्रेला सुरुवात होते. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दि.५ मे रविवार रोजी सकाळी देवीची पालखी दहीफळ येथून बँड लेझीम पथक व आराधी मंडळी देवीची गाणे गाऊन पालखी महोत्सवात सहभागी होतात. या वडजुआई ( वडमाऊली ) देवीला महीला पुरणपोळीचा नैवद दाखवुन जेवणाचा कार्यक्रम करतात यात्रेनिमित्त दहीफळ वडमाऊली येथील युवा नेते तथा पंचायत समीती सदस्य दत्तात्रय ( पिंटु ) ठोंबरे,सरपंच डॉ. शशिकांत दहिफळकर,राहूल गदळे,शरद गदळे यांनी व यात्रा कमिटीचे कमेटीचे अध्यक्ष येडूनाना ठोंबरे,सचिव भिकचंद ठोंबरे (सावकार), सदस्य हारीमास्तर ठोंबरे सह सर्व सदस्यांनी व गावक-यांनी पुढाकार घेऊन ग्रामीण भागातील जनतेच्या मनोरंजनासाठी ५ मे ६ हे दोन दिवस संध्याकाळी आठ वाजता हारीभाऊ बडे नगरकर सह शिवकन्या बडे नगरकर यांचा बहुरंगी लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.मंगळवारी संध्याकाळी आराधी गीताचा कार्यक्रम आयोजित केला आहे. बुधवारी संध्याकाळी वडमाऊली देवी मंदीर परीसरात देवीचा छबीना मिरवणूक होईल तर गुरुवारी संध्याकाळी दहिफळ गावात छबिना मिरवणूकीने यात्रेची सांगता होणार आहे.या आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमात यात्रेकरुंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून यात्रेची शोभा वाढवावी असे आव्हान वडमाऊली यात्रा कमेटीचे अध्यक्ष येडूनाना ठोंबरे,सचिव भिकचंद ठोंबरे (सावकार), कोषाध्यक्ष हारीमास्तर ठोंबरे,सदस्य गंगाधर गदळे,रामहारी ठोंबरे;बन्सी ठोंबरे सह इतर सदस्यांनी व गावक-यांनी केले आहे.









# गेवराई शाखेतील प्रकार : पैसे भरणा करण्यासाठी गेलेल्या ज्येष्ठ ग्राहकाशी कॅशियरची अरेरावी

गेवराई दि. 2 : वार्ताहर : येथील स्टेट बँक ऑफ हैदराबाद शाखेत गेल्या काही दिवसांपासून राम भरोसे कारभार सुरू असून, ग्राहकांना नाहक मानसिक त्रास दिला जात आहे. दरम्यान, कॅश काऊंटरवर पैसे भरण्यासाठी गेलेल्या एका ज्येष्ठ नागरिकाला अरेरावी करण्यात आल्याचा प्रकार घडला असून, ग्राहकाचे पैसे फेकून दिल्याने बॅन्केच्या हेकेखोर कारभाराविरुद्ध संताप व्यक्त केला जात आहे.

या विषयी सविस्तर माहिती अशी की,कैलास बबनराव मोरे हे हैदराबाद बॅन्केचे ग्राहक असून, गुरूवार ता. 2 रोजी सकाळी अकरा वाजता एक लाख रुपये, नगदी भरना करण्यासाठी गेवराई च्या शाखेत गेले होते. त्यांचा नंबर आल्यावर, त्यांनी कॅश काऊन्टरवरे एक लाख रू भरणा करण्यासाठी बॅन्केचे कॅशियर शुभम गायकवाड यांच्या कडे दिले. परंतू , त्यांनी ते पैसे भरून न घेता ग्राहकाच्या अंगावर फेकले. या संदर्भात, मोरे यांनी काही चुकले का ? अशी विचारणा केली. त्यावर, गायकवाड यांनी, मुजोरीत उत्तर देऊन, बाहेर जा. येथे पैसे भरू नका, एवढे ही कळत नाही. चलन दुसऱ्या काऊंटरवर भरावे लागते. व्हा बाजुला, अशी अरेरावीची भाषा करून, ज्येष्ठ ग्राहकाचा अपमान केला. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रीय बॅन्केतले अधिकारी, कर्मचारी ग्राहकांशी अरेरावी करतात. निट उत्तर देत नाहीत. गुर्मीत बोलून ग्राहकांचा अपमान करतात. आमचे कुणीच काही करू शकत नाहीत. काय करायचे तर करा, या आविर्भावात हे अधिकारी अनागोंदी कारभार करून ग्राहकांना मानसिक त्रास देत आहेत. गुरूवार ता. 2 रोजी सकाळी अकरा वाजता गेवराई शहरातील एका ज्येष्ठ नागरिकाशी गायकवाड नावाच्या मुजोर कॅशियरने हुज्जत घालून, अपमान केला. विशेष म्हणजे, हैदराबाद शाखेत उत्तम व्यवहार करणाऱ्या कैलास मोरे यांचा याच बॅन्केत सत्कार करण्यात आलेला आहे. असे असताना, मोरे यांना बॅन्केच्या अधिकाऱ्यांकडून सापत्न वागणूक मिळाल्याने, गेवराई शहरातील नागरिकांनी संताप व्यक्त केला असून, संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होऊ लागली आहे.



परमेश्वर सोळुंके यांचा वाढदिवस साजरा करताना संजीवनी हॉस्पिटलचे डॉक्टर ज्ञानेश्वर गिलबिले नवनाथ गिलबिले व त्यांचे वडील व पत्रकार उमेश कुमार जेथलिया सहकारी मित्र



आमचे मित्र परमेश्वर बप्पा सोळुंके यांचा वाढदिवस साजरा करताना संघर्ष लढा पत्रकार संघ व सहकारी मित्र

# निवडणुक आली की भावनिकतेच राजकारण करणा-या पंकजा मुंडे यांना प्रचंड मताने पराभूत करा -- भाई लहु सोळंके

विधानसभा असो वा लोकसभा निवडणूक प्रत्येक निवडणुकीत मतदारांना भावनिक करून तुमच्या समोर पदर पसरते माझ्या पदरात मतदान द्या अशी भावनिक साद बीड जिल्ह्यातील मतदारांना घालुन पंकजा मुंडे मतदारांना वेड्यात काढायचा प्रयत्न करत आहेत..परळी विधानसभेत पराभव झाल्यानंतर पाच वर्षात बीड जिल्ह्यात न फिरकणाऱ्या पंकजा ताई आज मतदारांसमोर स्वतःच्या स्वार्थासाठी पदर पसरवत आहेत... पाच वर्ष ताई कुठे होत्या ?? ज्या परळीच्या जनतेने यांना मतदान केले त्यांच्या सुख दुःखात सहभागी व्हायचं सोडून या विदेशात मुलाच्या शिक्षणाच कारण देत लंडनला टूर वर होत्या... लंडन मधुन फेसबुक लाईव्ह करून बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांचे प्रश्न सुटणार होते का ? उसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून आजही महाराष्ट्रात बीड जिल्ह्याची ओळख आहे.. अशी ओळख असणे म्हणजे जिल्ह्यासाठी शरमेची बाब आहे.. या जिल्ह्याचे नेतृत्व मुंडे बंधू भगिनी करतात..महाराष्ट्राच्या राजकारणात धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांना बीड जिल्ह्यातील जनतेने आजपर्यंत डोक्यावर घेतले... तर बदल्यात जिल्ह्यातील जनतेसाठी यांचं योगदान काय आहे ? कोणता एखादा उद्योग पंकजा ताई आणि धनंजय मुंडे यांनी बीड जिल्ह्यात उभारून तरुणांच्या हाताला काम दिल आहे ? एक उद्योग यांना सत्तेमध्ये राहुन मंत्रिपदे असताना जिल्ह्यासाठी आणता आला नाही... आजपर्यंत मतदारांच्या अपेक्षा या मुंडे परिवाराकडून जनतेच्या हितासाठी होत्या..पण जनतेचा अपेक्षाभंग कारण्यापलीकडे यांचं कार्य शून्य आहे... फक्त जिल्ह्याची शान मुंडे परिवार अस म्हणुन जनतेचे पोट भरणार आहे का?? जिल्ह्यातील मागासलेपण दूर करन्यात सपशेल अपयशी ठरणाऱ्या पंकजा मुंडे यांना घरचा रस्ता दाखवण्याची हीच योग्य वेळ आहे.. वेद्यनाथ कारखान्यात मुंडे साहेबांचा आत्मा आहे असे बोलणाऱ्या ताईंना कारखाना व्यवस्थित चालवता आला नाही..या कारखान्याने शेतकऱ्यांचे ऊस बिलाचे पैसे दिले नाहीत आणि कारखाना बंद पडला

# शेतकरी, ऊसतोड मजूर, कामगारांचे पैसे वेळेवर देणे हीच आमची औकात औकात, लायकी काढणाऱ्यांना बजरंग सोनवणेंचे परळीतून प्रतिउत्तर



## वैद्यनाथ कारखाना बंद असल्याचे दुःख - फुलचंद कराड

भाजपच्या उमेदवार या स्वतःला विकास कन्या म्हणून घेत आहेत. जर त्यांनी पालकमंत्री असताना मतदारसंघाचा विकास केला असता तर त्या निवडणुकीत पराभूत झाल्याच नसत्या. वैजनाथ साखर कारखाना बुडविण्यासाठीच या दोघा बहिण - भावांनी जागा वाटून घेतल्या. याचे वाईट वाटत नसून स्व. गोपीनाथ मुंडे यांनी रक्ताचे पाणी करून त्याची उभारणी केली. तो कारखाना बंद असल्याने त्याचे मनस्वी दुःख होते. त्यामुळे या दोन्ही बहिण भावांना आता मतदाराने घरी बसण्याची वेळ आलेली आहे. असे फुलचंद कराड म्हणाले.

## पौळ पिंपरीत जंगी स्वागत, रामेवाडीत बैलगाडीतून मिरवणूक

पौळ पिंपरी येथे गावकऱ्यांनी ढोल ताशा वाजवून आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे चिन्ह असलेल्या तुताऱ्या वाजवून बजरंग सोनवणे यांचे जंगी स्वागत केले. तर रामेवाडी (कासारवाडी) येथे सजविलेल्या बैलगाडीतून बजरंग बप्पा सोनवणे, बाबनभाऊ गित्ते, फुलचंद कराड आणि राजेसाहेब देशमुख यांची ढोल, ताशा आणि तुताऱ्या वाजवून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

**वादळवार्ता/परळी**

ज्यांना आपल्या वडिलांनी उभा केलेले साखर कारखाने नीट चालविता आले नाहीत. कारखान्यातील कामगार व शेतकऱ्यांचे ज्यांनी पैसे बुडविले, त्यांची लायकी काय ? त्यांनी आमची औकात व लायकी काढणे म्हणजे ही चेष्टा असून आम्ही ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे पैसे वेळेवर दिले. ऊसतोड कामगार व कारखान्यातील कामगारांचे कामाचे पैसे वेळेवर देणे हीच आमची औकात आहे अशी चपराक राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी पालकमंत्री आणि भाजप उमेदवारांना लगावली.

बीड लोकसभेचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे शुक्रवारी परळी तालुक्यात प्रचार दौऱ्यावर होते. त्यांनी पौळ पिंपरी येथे बोलताना पालकमंत्री व भाजपा उमेदवाराचा चांगलाच समाचार घेतला. यावेळी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष बबन भाऊ गित्ते, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, ॲड. अजय बुरांडे, सुदामतीताई गुट्टे, ॲड. माधव जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले की, एक सामान्य शेतकरी कुटुंबातील शेतकरी पुत्र असून सुद्धा मी दोन - दोन साखर कारखाने यशस्वीपणे चालवित आहे. मराठवाड्यात उसाला विक्रमी भाव देत आहे. ऊस उत्पादक शेतकरी, कामगार व ऊसतोड मजूरांचे पैसे आम्ही बुडवीले नसून आमच्या समर्थकांना जर कोणी धमकावीत असेल तर त्यासाठी आम्ही सदैव त्यांच्या पाठीशी उभे आहोत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी घाबरून जाण्याचे कारण नसून माझे दोन्ही कारखाने दुप्पट क्षमतेने चालू आहेत. माझा जन्म कोणत्याही राजकारणाच्या पोटी झालेला नसताना सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलो. माझे आई-वडील शेतकरी असले तरी मला राजकीय जन्म देणारे सामान्य नागरिक हे माझे राजकीय मायबाप आहेत. असे भावनिक उदगार काढून त्यांनी मागील दहा ते पंधरा वर्षांमध्ये जर भाजपने मतदारसंघाचा विकास केला असता तर मग त्यांना मतांची भीक मागण्याची आवश्यकता पडली नसती. असे सांगून जे आज मला विरोध करीत आहेत, त्यांचाही ऊस मीच गाळप केला. त्यामुळे उसासाठी कोणीही घाबरण्याचे कारण नाही. असे म्हणत त्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा ही दिला.

त्यांनी परळी तालुक्यातील गोवर्धन (हिवरा), हिवरा (गोवर्धन), रामनगर तांडा, जळगव्हाण, रामेवाडी (कासारवाडी), पोहनेर, दिग्रस, बोरखेड, तेलसमुख या गावांना भेटी दिल्या. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )